# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना**

दूरध्वनी क्रमांक २५६२२६८०

गणेशखिंड, पुणे ४११००७


संदर्भ क्र. विविमं/२०२०–२१/१९०    दिनांक : ३०/१२/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक/ मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग.

विषय : ***नवे शैक्षणिक धोरण २०२०*** विद्यापीठस्तरीय खुली निबंध स्पर्धा.

महोदय/महोदया,

आपण नव्या शैक्षणिक धोरणाला अनुसरून नवीन शिक्षण पद्धतीला सामोरे जाणार आहोत. नव्या शैक्षणिक धोरणाचे स्वागत करताना समाजातील सर्व घटकांशी विचार विनिमय व्हावा, उच्च शिक्षण क्षेत्रात या पार्श्वभूमीवर एक विचार मंथन व्हावे व त्यात समाज मनाचे प्रतिबिंब उमटावे या हेतूने; 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नवे शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी समिती', 'विद्यार्थी विकास मंडळ' आणि 'राष्ट्रीय सेवा योजना' यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन केले जात आहे.

शिक्षण क्षेत्राशी प्रत्यक्ष संबंधित विद्यार्थी, शिक्षक, प्रशासक तसेच समाजातील जागरूक प्रतिनिधींचे विचार देखील यानिमित्ताने संकलित करून शिक्षण क्षेत्रातील बदलांना दृढपणे सामोरे जाण्यास हे विचार मंथन निश्चितच साहयभूत ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे !

यास्तव विद्यापीठस्तरीय खुली निबंध स्पर्धा ५ गटांत प्रत्येकी ३ विषयांवर मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत आयोजित करण्यात आली असून प्रत्येकी प्रथम, द्वितीय आणि तृतीय अशी गटनिहाय पारितोषिके देण्यात येणार आहेत. अनुक्रमे रोख रूपये १०,०००/–, ७,०००/– व ५,०००/– व प्रमाणपत्र अशी एकूण १,१०,००० रूपयांची प्रोत्साहनपर पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन स्पर्धकांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच या विषयावर चर्चासत्र आयोजित निवडक निबंधाचे सादरीकरण व प्रकाशन करण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी दिनांक ०१ ते १५ जानेवारी, २०२१ या मुदतीत **sppunssbsd@gmail.com** या मेल आयडीवर हस्तलिखित किंवा टंकलिखित (मायक्रोसॉफ्ट वर्ड फाईलमध्ये टाईप) स्वरूपात प्रवेशिका व निबंध मागविण्यात येत असून प्राप्त निबंधांचे तज्ज्ञ परीक्षक समितीद्वारा गुणानुक्रमे मूल्यांकन केले जाणार आहे.

सदर निबंध स्पर्धेची संपूर्ण माहिती व नियमावली सोबत जोडून पाठवित असून ती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी. आपल्यासह या स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सदस्य, पालक व इतर समाज घटकांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे व या विचारमंथनात आपले प्रत्यक्ष योगदान नोंदवावे, असे आवाहन संयोजन समितीतर्फे आम्ही आपणांस करीत आहोत. कळावे, ही विनंती.

धन्यवाद!

सोबत : वरीलप्रमाणे.

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ

## नवे शैक्षणिक धोरण २०२० विद्यापीठस्तरीय खुली निबंध स्पर्धा

### : नियमावली :

१. नवे शैक्षणिक धोरण २०२० च्या संदर्भाने संबंधित भूमिकांचा विचार करून निबंध स्पर्धेसाठी पुढीलप्रमाणे पाच गट व गटनिहाय विषय निश्चित करण्यात आलेले आहेत. सहभागी स्पर्धकांनी सदर नियमावलीच्या अधीन राहून निवडलेल्या विषयावर मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील किमान २००० ते कमाल ५००० शब्दमर्यादेचे निबंध पाठवावेत.

| अ.क्र. | गट | विषय | | |
|---|---|---|---|---|
| १ | पदवीस्तरीय विद्यार्थी | नवे शैक्षणिक धोरण आणि अभिजात भारतीय शिक्षण परंपरा. | **New Education Policy and traditional Indian Education system.** | नई शिक्षा नीति और अभिजात भारतीय शिक्षा परंपरा। |
| | | नवे शैक्षणिक धोरण आणि समाज. | **New Education Policy and Society.** | नई शिक्षा नीति और समाज। |
| | | नव्या शैक्षणिक धोरणव्यवस्थेकडून माझ्या अपेक्षा. | **My expectations from the new Education Policy System.** | नई शिक्षा नीति प्रणाली से मेरी अपेक्षाएँ। |
| २ | पदवी प्राप्त, पदव्युत्तरस्तरीय, तथा संशोधक विद्यार्थी | नव्या शैक्षणिक धोरणात सृजनात्मक नवता. | **Creative innovation in new Education Policy.** | नई शिक्षा नीति में रचनात्मक नवोन्मेष। |
| | | नवे शैक्षणिक धोरण आणि वैश्विकरण. | **New Education Policy and Globalization.** | नई शिक्षा नीति और वैश्वीकरण। |
| | | नवे शैक्षणिक धोरण आणि मी. | **New Education Policy and Me.** | नई शिक्षा नीति और मैं। |
| ३ | शिक्षक व समकक्ष (सेवाधीन तसेच निवृत्त) | अभिजात भारतीय शिक्षणमूल्ये आणि नवे शैक्षणिक धोरण. | **Traditional Indian Education Values and New Education Policy** | अभिजात भारतीय शिक्षा-मूल्य और नई शिक्षा नीति। |
| | | नवे शैक्षणिक धोरण—आव्हान आणि संधी. | **New Education Policy - Challenges and Opportunities.** | नई शिक्षा नीति - चुनौतियां और अवसर। |
| | | नव्या शैक्षणिक धोरणात संशोधन आणि संशोधनाचे उपयोजन (उपयोजित संशोधन). | **'Research' and 'Application of Research' (applied research) in new Education Policy.** | नई शिक्षा नीति में शोध एवं नई शिक्षा नीति में अनुसंधान का अनुप्रयोग (अनुप्रयुक्त अनुसंधान)। |
| ४ | प्राचार्य, संचालक, विभागप्रमुख, शैक्षणिक प्रशासक व समकक्ष (सेवाधीन तसेच निवृत्त) | नवे शैक्षणिक धोरण — उद्दिष्टपूर्तीच्या आव्हानाला सामोरे जाताना. | **New Education Policy - meeting the challenges of objectives.** | नई शिक्षा नीति – उद्देश्यपूर्ति की चुनौतियां। |
| | | नव्या शैक्षणिक धोरणातून व्यक्तिमत्व, क्षमता आणि कौशल्यविकास. | **Personality, Ability and Skill Development through New Education Policy.** | नई शिक्षा नीति के माध्यम से व्यक्तित्व, क्षमता और कौशल विकास। |
| | | नव्या शैक्षणिक धोरणात भाषा विभागांचे महत्त्व. | **The importance of languages in new Education Policy.** | नई शिक्षा नीति में भाषा विभागों का महत्व। |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | सेवाधीन तसेच निवृत्त शिक्षकेतर सदस्य, शिक्षणप्रेमी, समाजप्रतिनिधी, पालक इत्यादी | शिक्षणोपचार की शिक्षणसंस्कार. | **New Education Policy : Formal Education Or Value Based.** | **औपचारिक शिक्षा या शिक्षासंस्कार।** |
| | | नवे शैक्षणिक धोरण आणि सामाजिक दायित्त्व. | **New Education Policy and social responsibility.** | **नई शिक्षा नीति और सामाजिक दायित्व।** |
| | | नवे शैक्षणिक धोरण आणि आत्मनिर्भर भारत. | **New Education Policy and Self-Reliant India.** | **नई शिक्षा नीति और आत्मनिर्भर भारत।** |

२. सदर स्पर्धा विहित गटांतील सर्वांसाठी खुली असून गटनिहाय दृष्टीकोनातून निर्दिष्ट विषयांवर मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांमध्ये गटनिहाय प्राप्त झालेल्या निबंधांचे एकत्रित व साकल्याने गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी मूल्यांकन केले जाईल. **(भाषावार मूल्यांकन केले जाणार नाही)**

३. प्रत्येक गटातून विजेत्यांना प्रथम क्रमांक रूपये १०,०००/—, प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक रूपये ७,०००/—,प्रमाणपत्र व तृतीय क्रमांक ५,०००/—, प्रमाणपत्र स्वरूपात पारितोषिक प्रदान केले जाईल.

४. वरील स्पर्धेसाठी हस्तलिखित किंवा टंकलिखित स्वरूपातील निबंध दिनांक ०१ ते १५ जानेवारी, २०२१ या कालावधीत **sppunssbsd@gmail.com** या मेल आयडीवर १. हस्तलिखित असल्यास स्कॅन करून (PDF स्वरूपात) किंवा २. टंकलिखित असल्यास (मायक्रोसॉफ्ट वर्ड फाईलमध्ये सॉफ्ट कॉपी) स्वरूपात पाठवावेत.

५. भाषा, गट, गटनिहाय विषय, निबंध लिखाणाची व पाठविण्याची पद्धत, स्वरूप, शब्दमर्यादा, कालमर्यादा याबाबतच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. यासंदर्भातील निर्देशांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवेशिका व निबंध बाद करण्यात येऊन स्पर्धेतील मूल्यांकन ासाठी अग्राह्य ठरतील.

६. स्पर्धकांना आपला गट तसेच योग्य ठरत असल्यास इतर गटातील एक अथवा एकापेक्षा जास्त विषयांवर देखील निबंध पाठविता येतील. स्पर्धकांनी एका पेक्षा जास्त निबंध पाठवित असल्यास प्रत्येक निबंधासाठी स्वतंत्र प्रवेशिका व पृष्ठ/स्वतंत्र वर्ड फाईल सादर करावी. मात्र एकाच स्पर्धकाने एकाच विषयावरील दोन निबंध अथवा एकाच निबंधाचे रूपांतर अथवा अन्य भाषेतील भाषांतर पाठविल्यास अशा प्रवेशिका व निबंध बाद आणि अग्राह्य ठरतील. तसेच एका प्रवेशिकेत अपूर्ण अथवा एकापेक्षा जास्त निबंध पाठविल्यास सदर प्रवेशिका व निबंध बाद ठरून अग्राह्य ठरतील.

७. लिखाणातील आशय, मुद्देसुद मांडणी, संदर्भ, विवेचन व सारगर्भिता यांच्या आधारे निबंधाचे एकत्रित व साकल्याने मुल्याकंन केले जाईल. व उत्कृष्टतेच्यादृष्टीने निबंधांचा सादरीकरण, प्रसिद्धी, प्रकाशन व पारितोषिकांसाठी गुणानुक्रमे विचार केला जाईल.

८. विषयांतर करणारे, असंबद्ध, अयोग्य भाषा—संदर्भ—मजकूर असलेले इत्यादी स्वरूपाचे निबंध अग्राह्य ठरून स्पर्धेच्या कोणत्याही टप्प्यांमध्ये समाविष्ट केले जाणार नाहीत. प्राप्त प्रवेशिका कोणत्याही टप्यावर व कोणत्याही कारणास्तव अग्राह्य अथवा बाद ठरवण्याचा संयोजक व परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वासाठी बंधनकारक व अंतिम स्वरूपाचा असेल.

९. मूल्यांकनाबाबत परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांवर बंधनकारक राहिल.

१०. या खुल्या निबंध स्पर्धेच्या प्रत्येक गटांतील निवडक १० निबंधांचे चर्चासत्रात प्रत्यक्ष सादरीकरण व प्रकाशन शुक्रवार, दिनांक ५ फेब्रुवारी, २०२१ रोजी करण्यात येईल.

## हस्तलिखित निबंध सादर करण्याकरिता सूचना

१. आपल्या निबंधाच्या पहिल्या पृष्ठावर खालील माहिती असलेली प्रवेशिका भरून ती संपल्यावर पुढील स्वतंत्र पृष्ठापासून निबंध लिखाण असावे. तसेच पहिल्या पृष्ठावर निबंधाचा सारांश (कमाल शब्द मर्यादा १५०) असणे आवश्यक आहे. विहित पद्धतीने प्राप्त झालेल्या प्रवेशिका व निबंध सर्व नियमावलीच्या अधीन मानून विचारात घेतले जातील.

### प्रवेशिका

| अ.क्र. | शिर्षक | विवरण |
|---|---|---|
| ०१ | स्वत:चे संपूर्ण नाव | |
| ०२ | पदनाम | |
| ०३ | पत्ता | |
| ०४ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ०५ | ई—मेल | |
| ०६ | सध्याच्या अथवा शैक्षणिक प्रवेश असलेल्या शेवटच्या महाविद्यालय/परिसंस्थेचे नाव व पत्ता | |
| ०७ | निबंध स्पर्धेसाठीचा गट | |
| ०८ | गटनिहाय निवडलेला विषय | |
| ०९ | निबंध लेखनाची भाषा | |

निबंधाचा सारांश (कमाल शब्द मर्यादा १५०)

..........................................................................................................................
..........................................................................................................................
..........................................................................................................................
..........................................................................................................................
..........................................................................................................................

२. निबंध लेखनाकरिता 'ए/४ **(A/4)**' आकाराचा कागद वापरावा.

३. आपल्या निबंधाच्या प्रत्येक पृष्ठाच्या खालील बाजूस (प्रथम पृष्ठ वगळता) आपले नाव, गट व विषय मोबाईल क्रमांक लिहणे आवश्यक आहे.

४. आपली प्रवेशिका व निबंध एकाचवेळी एकत्रित पाठवावी. अग्रिम प्रवेशिका पाठवू नये.

५. स्पर्धकांना आपला गट तसेच योग्य ठरत असल्यास इतर गटातील एक अथवा एकापेक्षा जास्त विषयांवर देखील निबंध पाठविता येतील. स्पर्धकांनी एका पेक्षा जास्त निबंध पाठवित असल्यास प्रत्येक निबंधासाठी स्वतंत्र प्रवेशिका व निबंध सादर करावेत. मात्र एकाच स्पर्धकाने एकाच विषयावरील दोन निबंध अथवा एकाच निबंधाचे रूपांतर अथवा अन्य भाषेतील भाषांतर पाठविल्यास अशा प्रवेशिका व निबंध बाद करून अग्राह्य ठरतील. तसेच एका प्रवेशिकेत अपूर्ण अथवा एकापेक्षा जास्त निबंध पाठविल्यास सदर प्रवेशिका व निबंध बाद आणि अग्राह्य ठरतील.

६. **हस्तलिखित निबंध स्कॅन करून (PDF स्वरूपात) दिनांक ०१ ते १५ जानेवारी, २०२१ या कालावधीत sppunssbsd@gmail.com या मेल आयडीवर पाठवावेत. निबंध व प्रवेशिका प्रत्यक्ष स्वरूपात (हार्ड कॉपी) पाठवू नये.**

## टंकलिखित स्वरूपातील निबंध सादर करण्याकरिता सूचना (सोबत : मायक्रोसॉफ्ट वर्ड फाईल)

१. टंकलिखित निबंध पाठविणाऱ्या स्पर्धकांनी खाली निर्देशित केल्याप्रमाणे प्रवेशिका व निबंध मायक्रोसॉफ्ट वर्ड फाईलमध्ये टाईप करावेत. सदर वर्ड फाईलमध्ये पहिल्या पृष्ठावर खालील माहितीची प्रवेशिका भरून ती संपल्यावर पुढील स्वतंत्र पृष्ठापासून निबंध टंकलिखित करावा विहित पद्धतीने प्राप्त झालेल्या प्रवेशिका व निबंध सर्व नियमावलीच्या अधीन मानून विचारात घेतले जातील.

| अ.क्र. | शीर्षक | विवरण |
|---|---|---|
| ०१ | स्वत:चे संपूर्ण नाव | |
| ०२ | पदनाम | |
| ०३ | पत्ता | |
| ०४ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ०५ | ई–मेल | |
| ०६ | सध्याच्या अथवा शैक्षणिक प्रवेश असलेल्या शेवटच्या महाविद्यालय/परिसंस्थेचे नाव व पत्ता | |
| ०७ | निबंध स्पर्धेसाठीचा गट | |
| ०८ | गटनिहाय निवडलेला विषय | |
| ०९ | निबंध लेखनाची भाषा | |
| १० | निबंधाचा सारांश (कमाल शब्द मर्यादा १५०) | |

२. स्पर्धकांनी निबंध टाईप करताना भाषा, फॉन्ट, अंक व आकृती यासंदर्भात पुढील दिशानिर्देशांचे कटाक्षाने पालन करावे.

| Language | Font | Font size | Settings | Text | **Numbers** | Figures |
|---|---|---|---|---|---|---|
| Marathi & Hindi | Google Marathi & Hindi Input | 14 | Normal | Normal | **English** | Normal |
| | DVB TT Surekh | 16 | Normal | Normal | **English** | Normal |
| | Kruti Dev 050/ 055 | 16 | Normal | Normal | **English** | Normal |
| | Shreelipi 708 | 16 | Normal | Normal | **English** | Normal |
| | | | | | | |
| English | Times New Roman | 14 | Normal | Normal | **English** | Normal |
| | | | Normal | Normal | **English** | Normal |
| *Imp. – Please ensure all the numbers or numeric figures **must** be in English only. | | | | | | |

३. निबंधाच्या मायक्रोसॉफ्ट वर्ड फाईलमध्ये खालील बाजूस असलेल्या फूटरमध्ये निर्दिष्ट माहिती पहिल्या पृष्ठावर एकदाच संपूर्णपणे भरावी. (उर्वरित पृष्ठावर ती आपोआप दिसेल याची खात्री करून घ्यावी.)

४. आपली प्रवेशिका व निबंध सोबत जोडलेल्या मायक्रोसॉफ्ट वर्ड फाईलमध्ये टाईप करून एकाचवेळी एकत्रित पाठवावी. अग्रिम प्रवेशिका पाठवू नये. प्रवेशिका व निबंध दोन वेगवेगळया मेलमध्ये प्राप्त झाल्यास अग्राह्य ठरतील.

५. स्पर्धकांना आपला गट तसेच योग्य ठरत असल्यास इतर गटातील एक अथवा एकापेक्षा जास्त विषयांवर देखील निबंध पाठविता येतील. स्पर्धकांनी एका पेक्षा जास्त निबंध पाठवित असल्यास प्रत्येक निबंधासाठी स्वतंत्र प्रवेशिका व स्वतंत्र वर्ड फाईल सादर करावी. मात्र एकाच स्पर्धकाने एकाच विषयावरील दोन निबंध अथवा एकाच निबंधाचे रूपांतर अथवा अन्य भाषेतील भाषांतर पाठविल्यास अशा प्रवेशिका व निबंध बाद करून अग्राह्य ठरतील. तसेच एका प्रवेशिकेत अपूर्ण अथवा एकापेक्षा जास्त निबंध पाठविल्यास सदर प्रवेशिका व निबंध बाद ठरून अग्राह्य ठरतील.

६. **सदर प्रवेशिका व निबंध असलेली मायक्रोसॉफ्ट वर्ड फाईल स्वरूपात दिनांक ०१ ते १५ जानेवारी, २०२१ या कालावधीत sppunssbsd@gmail.com या मेल आयडीवर पाठवावी. निबंध व प्रवेशिका प्रत्यक्ष स्वरूपात (हार्ड कॉपी) पाठवू नये.**